सत्र खटला क्र. ३/२०२०
सरकार -वि- श्रीराम अवचार.
निशाणी क्रमांक-३१

**सरकारतर्फे साक्षीदार क्र.०२ याची जबानी**

मी सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की

**माझे नांव - रोशन श्रीराम अवचार,**
**वय - २८ वर्ष, व्यवसाय - मजुरी,**
**राहणार - दाभा.**

**अभियोग पक्षातर्फे सरतपास विधिज्ञ श्री. एस. एच. जोशी.**

०१. मयत सरीता ही माझी आई होती. आरोपी माझा वडील आहे. फिर्यादी माझी आजी आहे. माझ्या आईची मानसिकस्थिती ठिक नसायची त्यामुळे तिचा वैद्यकीय उपचार आरोपीने केला होता. दि.२२/०८/२०१९ रोजी ती मरण पावली. ती कश्यामुळे मयत झाली हे मला सांगता येत नाही. ती मयत झाल्यानंतर मी पोलिस ठाणे धामणगाव बढे येथे तक्रार दाखल केली. सदर तक्रार मला दाखविली. त्यावर माझी सही आहे. ती **निशाणी क्र.३२** वर आहे. पोलिसांनी माझा जबाब नोंदवला नाही. असे काही घडले नाही की, आरोपीच्या जाचाला कंटाळून माझ्या आईने विष पिउन आत्महत्या केली.

सरतपास पुर्ण.

***(साक्षीदार अभियोग पक्षाला मदत करत नसल्याने सरकारी वकीलांनी त्याला फितूर घोषित करून उलट तपास करण्याची परवाणगी मागीतली ती देण्यात आली.)***

**उलट तपास सरकारी वकिलामार्फत**

०२. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी माझा जबाब नोंदविला होता. माझ्या जबाबातील अधोरेखांकीत भाग-अ मला वाचून दाखविला तो मी पोलिसांना सांगितला नाही. तो पोलिसांनी माझ्या जबाबात का लिहीला आहे हे मी सांगु शकत नाही. हे म्हणणे

खरे नाही की, आरोपीने माझ्या आईला त्रास दिल्यामुळे तिने आत्महत्या केली. माझे तपासादरम्यान न्यायालयासमक्ष बयान झाले नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी माझे वडील असल्यामुळे त्याला वाचविण्याकरीता मी खोटी साक्ष देत आहे.

**आरोपीतर्फे उलट तपास विधिज्ञ श्री. वाय. एन. डवले.**

०२. नाकारला.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास काही नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

Digitally signed by RAJENDRAKUMAR BABASAHEB GIRI
Date: 2026.02.17 17:45:17 +0545

**(आर. बी. गिरी)**

अतिरिक्त सत्र न्यायाधीश मलकापूर

मलकापूर.

दिनांक - १७/०२/२०२६.

## CERTIFICATE

I certify that this order P.D.F. uploaded is a true and correct copy of original signed order.

| | | |
|---|---|---|
| Name of Court | : | Adhoc District Judge – 1 & Additional Sessions Judge, Malkapur. |
| Name of Stenographer | : | Shri. V. S. Jadhav. (Junior Clerk) |
| Date of order | : | 17.02.2026 |
| Date of signed on order by Judicial Officer | : | 17.02.2026 |
| Date of uploading | : | 17.02.2026 |